# एचडीएफसी बँक एबिक्सकॅश प्रीपेड कार्डच्या सर्वसाधारण अटी व शर्ती

हे एचडीएफसी बँक एबिक्सकॅश प्रीपेड कार्ड एचडीएफसी बँक लि. या कंपनी कायदा, 1956 या अंतर्गत स्थापन झालेल्या व बँकिंग नियमन कायदा, 1949 मधील तरतुदीनुसार एक बँक म्हणून परवाना मिळालेल्या, तसेच एचडीएफसी बँक हाउस, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई - 400013 ("एचडीएफसी बँक") येथे नोंदणीकृत व कॉर्पोरेट कार्यालय असलेल्या बँकिंग कंपनीने जारी केले आहे. इट्झ कॅश कार्ड प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीची स्थापना भारतीय कंपनी कायदा, 1956 या अंतर्गत झाली आहे आणि कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय टॉप 14वा मजला, टाइम्स टॉवर, कमला सिटी, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई - 400 013 ("एबिक्सकॅश") येथे आहे. एबिक्सकॅश हे इट्झ कॅश कार्ड प्रायव्हेट लिमिटेडचे ट्रेड व ब्रँडनेम आहे. एचडीएफसी बँकेने इट्झ कॅश कार्ड प्रायव्हेट लिमिटेडची नियुक्ती एचडीएफसी बँक एबिक्सकॅश प्रीपेड कार्डची बिझनेस करस्पॉडंण्ट व प्रोग्रॅम मॅनेजर म्हणून केली आहे.

(अटी व शर्ती) एबिक्सकॅशच्या www.ebixcash.com या वेबसाइटवर नमूद केलेल्या अटी व शर्ती (एकत्रित उल्लेख "अटी") एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक यांच्यातील व्यावसायिक करारानुसार, तुमच्याकडील ("कार्डधारक") एबिक्सकॅश/एचडीएफसी बँकेच्या को-ब्रँड प्रीपेड कार्डच्या ("कार्ड") वापराचे प्रशासन करतात. कार्डधारक याद्वारे अटी व शर्ती यांचे पालन करण्याचे मान्य करत आहे, तसेच कार्डाने व्यवहार करून किंवा कार्ड मिळाल्याची लेखी पोचपावती देऊन किंवा कार्डाच्या मागील बाजूला सही करून कार्डधारकाने अटी व शर्ती विनाशर्त मान्य केल्या असल्याचे, तसेच सर्व अटी व शर्ती वाचल्याचे व समजल्याचे मानण्यात येईल. कार्डाच्या वापरासंबंधीच्या महत्त्वाच्या सूचना/मार्गदर्शक तत्त्वे/ परिपत्रक यातील कोणत्याही बदलांबद्दल/सुधारणांबद्दल माहिती करून घेण्याची जबाबदारी कार्डधारकाची राहील. कार्डाच्या वापरासंबंधीच्या लागू असलेल्या व वेळोवेळी जारी केलेल्या महत्त्वाच्या सूचना/मार्गदर्शक तत्त्वे/ परिपत्रक यांचे कार्डधारकाने उल्लंघन केल्यास त्याचे संपूर्ण दायित्व एचडीएफसी बँकेकडे असणार नाही. अटी व शर्ती अमान्य असतील तर कार्डधारकाने कार्ड वापरू नये आणि कार्ड तातडीने एबिक्सकॅश/एचडीएफसी बँकेला परत करावे. बँकेच्या www.hdfcbank.com या वेबसाइटवर उपलब्ध असलेले बँकेचे ग्राहक संरक्षण धोरण वाचावे किंवा नजिकच्या शाखेशी संपर्क करावा. हे धोरण भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तयार करण्यात आले आहे आणि तुम्ही व्यवहार केलेला नसतानाही तुमच्या खात्यातून/कार्डाद्वारे रक्कम काढली गेल्यास ते तुम्हाला मदत करेल.

(कार्ड खात्याच्या तपशिलाची उपलब्धता) उपलब्ध बॅलन्ससह ("कार्ड बॅलन्स") कार्डाविषयी माहिती www.ebixcash.com येथे योग्य लॉग-इन केल्यावर किंवा कार्डाची मागील बाजूस दिलेल्या फोन नंबरवर आणि/किंवा ईमेलवर कस्टमर सर्व्हिस सेंटरला कॉल करून किंवा लिहून मिळवता येऊ शकते.

1. वापर, मर्यादा व सुरक्षितता

(वापर) कार्ड जारी करणे व त्याचा वापर हे एचडीएफसी बँकेने वेळोवेळी जारी केलेल्या नियम व नियमन यांच्या अधीन असेल. कार्डधारक या कार्डाचा वापर केवळ भारतामध्ये खरेदी करण्यासाठी किंवा व्यापाऱ्यांकडून रुपयांमध्ये वस्तू व सेवा मिळवण्यासाठी करतील.

(हस्तांतरण) कार्डधारकाला कोणत्याही परिस्थितीत कार्ड हस्तांतरित किंवा असाइन करता येणार नाही.

(कार्ड हरवणे व चोरीला जाणे) कार्ड किंवा कार्डाचा पिन हरवला, चोरीला गेला किंवा त्याचा गैरवापर झाला तर कार्डाच्या मागील बाजूला दिलेल्या टेलिफोन क्रमांकांवर कस्टमर सर्व्हिस सेंटरशी ("कस्टमर सर्व्हिस सेंटर") तातडीने संपर्क करावा. तुम्ही पिन लक्षात ठेवावा व पिन मेलर तातडीने नाहीसा करावा. नोंद केल्यापासून 24 तासांच्या आत कार्ड ब्लॉक केले जाईल आणि तुम्ही कार्ड हरवल्याचे नोंदवल्यापासून तुमच्या पैशांचे संरक्षण करण्याची जोखीम सुरू होते. पूर्णतः स्वतःच्या मतानुसार आणि कार्डधारकाच्या ओळखीची खातरजमा केल्यावर एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक नमूद केलेले शुल्क आकारून, हरवलेल्या कार्डाच्या बदल्यात नवे कार्ड जारी करू शकते.

(कायदेशीर बाबी) कार्डधारक कार्डाचा वापर कायदेशीर पद्धतीने व कायदेशीर हेतूने करेल.

(थर्ड पार्टीकडून वापर) अनधिकृत वापरापासून कार्डधारकाचे हितरक्षण करण्यासाठी, तुम्ही कार्ड सदैव तुमच्या ताब्यात ठेवावे.

(जबाबदारी) कार्डधारकाने संपादित केलेल्या वस्तू व सेवा यासंबंधी, गुणवत्ता, मूल्य, वॉरंटी, डिलेव्हरीमध्ये विलंब, डिलेव्हरी न मिळणे, कोणत्याही वस्तू किंवा सेवा न मिळणे यासह कोणत्याही वादासाठी ना एचडीएफसी बँक, ना एबिक्सकॅश कोणत्याही पद्धतीने जबाबदार असेल. कार्ड ही व्यापाऱ्यांना पेमेंट करण्यासाठी कार्डधारकांसाठी केवळ एक सुविधा आहे आणि एचडीएफसी बँक गुणवत्ता, संख्या, मूल्य, डिलेव्हरी वा अन्य कशाहीबद्दल कोणतीही वॉरंटी देत नाही किंवा प्रतिनिधीत्व करत नाही, मात्र वस्तू व सेवा किंवा अन्य अशा कोणत्याही वादाचे निराकरण कार्डधारकाने थेट व्यापाऱ्याबरोबर करावे, हे स्पष्टपणे समजून घ्यावे.

(कार्ड बॅलन्समधील बदल) व्यवहार रिव्हर्स झाल्यास ग्राहक कार्ड अकाउंटमधील क्रेडिटसाठी पात्र ठरू शकतो, मात्र कार्डधारकाला रोख रक्कम रिफंड केली जाणार नाही. एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक पैसे रिफंड करत असताना, संबंधित व्यापाऱ्याने आकारलेले शुल्क वसूल करेल.

(व्यवहारांवरील मर्यादा) एबिक्सकॅश, एचडीएफसी बँक आणि/किंवा पॉइंट ऑफ सेलवरील व्यापारी हे निश्चित कालावधीदरम्यान कार्डाद्वारे केल्या जाणाऱ्या व्यवहारांच्या संख्येवर व व्यवहारांच्या रकमेवर मर्यादा घालू शकतात ("व्यवहारांवरील मर्यादा"). www.ebixcash.com वेबसाइटवर नमूद केलेली व्यवहारांवरील मर्यादा कार्डाला लागू असेल. एबिक्सकॅश/ एचडीएफसी बँक केव्हाही, कोणत्याही कारणाने व्यवहारांवरील मर्यादांमध्ये सुधारणा करू शकते. कार्डधारकांना हे बदल ebixcash.com येथे येथे पाहता येऊ शकतात किंवा कस्टमर सर्व्हिस सेंटरला कॉल करू शकतात. लागू असलेल्या कायद्याच्या अनुषंगाने, ग्राहकाला सूचना दिली जाईल.

2. एक्स्पायरेशन, कॅन्सलेशन व टर्मिनेशन

तुम्हाला जारी करण्यात आलेले कार्ड 5 वर्षे कालावधीसाठी किंवा कार्डावर छापलेल्या कालावधीसाठी लागू असेल. कार्डावर  नमूद केलेल्या एक्स्पायरेशन तारखेला कार्ड एक्स्पायर होईल. एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक पुढील बाबतीत

कार्ड तातडीने रद्द करू शकते किंवा कार्डाचा वापर स्थगित करू शकते: (i) कार्डधारकाने कार्ड हरवल्याचे कळवणे, (ii) सातत्याने 90 दिवस कार्डाचा वापर न करणे, (iii) 90 दिवसांच्या कालावधीमध्ये कार्डामध्ये बॅलन्स नसणे, (iv) कार्डधारकाकडून अटी व शर्तींचे उल्लंघन होणे, (v) कार्ड कॅन्सल किंवा सस्पेंड करण्यासाठी कॉर्पोरेटकडून विशिष्ट विनंती केली जाणे, किंवा (vi) कार्ड कॅन्सल किंवा सस्पेंड करण्यासंबंधी प्रोसेसिंग पेमेंट्स, किंवा (vi) कायदे किंवा नियमनाने लादलेल्या मर्यादांचा समावेश असलेल्या पण त्यापुरत्या मर्यादित नसलेल्या कारणांसह, रास्त नियंत्रणाच्या पलीकडील कारणांमुळे कार्डसंबंधी प्रोसेसिंग पेमेंटविषयी एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक असमर्थ किंवा त्यावर प्रतिबंध.

3. कार्ड बॅलन्स

(कार्ड बॅलन्स) या अटी व शर्तींच्या अनुषंगाने, कार्डधारक कार्डाचा योग्य वापर करून कार्ड बॅलन्स वापरू शकतो. कार्डधारकाला कोणतेही व्याज दिले जात नाही. कार्डधारकाने लागू असलेल्या शुल्कासह, आवश्यक रकमेची खरेदी करणे/सेवांचा लाभ घेणे गरजेचे आहे, अन्यथा संबंधित व्यवहार पूर्ण होणार नाही.

(अनियमितता) मर्चंट आस्थापनेमध्ये व्यवहारांच्या तपशिलात कोणतीही अनियमितता किंवा असंबद्धता आढळल्यास, व्यवहार केल्याच्या तारखेपासून 30 दिवसांच्या आत कार्डधारक एबिक्सकॅशला त्याबद्दल सूचित करेल. या कालावधीमध्ये यासंबंधी कोणतीही सूचना दिली न गेल्यास, व्यवहार अचूक योग्य असल्याचे एबिक्सकॅश गृहित धरेल.

4. शुल्क व लागू असलेले कर

एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक लागू असलेले सर्व शुल्क व फी कार्ड बॅलन्समधून वजा करेल.

| वस्तू/सेवा | शुल्क |
| --- | --- |
| इश्युअन्स फी | 100 रुपये |
| एबिक्सकॅश वर्ड आउटलेटमध्ये रीलोड | रीलोड स्लॅब: लागू असलेल्या शुल्कानुसार स्लॅब (किमान 15 रुपये व कमाल 50 रुपये) |
| | 1-2,000 - 15 रुपये |
| | 2,001-5,000 - 25 रुपये |
| | 5,001-15,000 - 35 रुपये |
| | 15,001 & above - 50 रुपये |

| | |
|---|---|
| एटीएममधून पैसे काढणे | अन्य बँकेच्या एटीएममधून 22 रुपये (करासह) |
| वार्षिक शुल्क | दरवर्षी 20 रुपये |
| एटीएम व आयपिन री-जनरेशन फी | 30 रुपये |
| कार्ड रिप्लेसमेंट/डॅमेज्ड | 70 रुपये |
| एबिक्सकॅश वर्ल्ड आउटलेटकडून स्टेटमेंट | 10 रुपये |
| इनअक्टिव्ह कार्ड फी (6 महिने) | 25 रुपये |
| कार्ड क्लोजर फी | 50 रुपये |
| एटीएम बॅलन्स इन्क्वायरी | 10 रुपये (करासह) |
| एक्स्पायरीनंतर कार्ड जारी करणे | 100 रुपये |
| पेमेंट गेटवे चार्जेस | विविध वेबलाइट व पेमेंट गेटवेवर नमूद केल्यानुसार |
| नेट-बँकिंगमार्फत रीलोड | लागू असल्यानुसार शुल्क |

*सर्व फी व शुल्क वेळोवेळी, कोणत्याही पूर्वसूचनेनुसार बदलाच्या अधीन आहेत.

5. एबिक्सकॅश/एचडीएफसी बँकचे दायित्व

एबिक्सकॅश/एचडीएफसी बँकेचे दायित्व कोणत्याही वेळी कार्डामध्ये असलेल्या रकमेइतके मर्यादित असेल.

6. माहितीचे संरक्षण

ग्राहकांच्या सूचनांच्या अनुषंगाने कार्ड उपलब्ध करण्यासाठी, कार्ड तयार करण्यासाठी, कार्ड किंवा त्याचा वापर यासंबंधी ग्राहकांच्या कोणत्याही शंकांचे निरसन करण्यासाठी, आकडेवारीविषयक व नियमनात्मक रिपोर्टिंगसाठी व घोटाळ्यांना प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने, एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक कार्डधारकाच्या वैयक्तिक माहितीवर प्रक्रिया करेल.

एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक गोपनीयरित्या आणि माहितीच्या संरक्षणाविषयक व बँक सिक्रसी लॉ या अंतर्गत जितक्या प्रमाणात परवानगी आहे तितकीच कार्डधारकांची माहिती अर्जावर प्रक्रिया करणाऱ्या, घोटाळ्यांची पाहणी

करणाऱ्या, ग्राहकसेवा देणाऱ्या, कार्ड उत्पादन व तंत्रज्ञान प्रक्रिया सेवा देणाऱ्या, आणि त्यांचे सर्व एजंट व उपकंत्राटदार अशा अन्य कंपन्यांना व थर्ड पार्टींना देईल.

एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक पुढील घटकांना कार्डधारकांची वैयक्तिक माहिती जाहीर करू शकते : (i) ग्राहक, (ii) चुकीची किंवा खोटी माहिती दिली गेली असेल व घोटाळा झाल्याचा संशय असेल, तर घोटाळा रोखणाऱ्या यंत्रणांना, आणि (iii) वैधानिक/नियामक अधिकाऱ्यांना, कायदा अंमलबजावणी किंवा घोटाळा रोखणाऱ्या यंत्रणांना, जेथे लागू असलेल्या कायद्यानुसार किंवा न्यायालयाच्या आदेशानुसार आम्ही तसे करणे गरजेचे आहे. उच्च दर्जाची सेवा देण्यासाठी आणि सुरक्षितता, माहिती संकलन व प्रशिक्षणाच्या हेतूने, किंवा लागू असलेल्या कायद्यानुसार आवश्यकता असल्याने मदत होण्याच्या दृष्टीने, एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक टेलिफोन कॉल रेकॉर्ड आणि/किंवा मॉनिटर करू शकते. सर्व रेकॉर्डिंग एबिक्सकॅश/एचडीएफसी बँकच्या मालकीची असतील. वर नमूद केलेल्या उद्देशाने, एबिक्सकॅश/एचडीएफसी बँकेकडून आणि वर नमूद केलेल्या घटकांकडून आपल्या वैयक्तिक माहितीवर प्रक्रिया करण्याची (हस्तांतरासह) अनुमती कार्डधारक देतो.

7. संकीर्ण

(सुधारणा) एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक ग्राहकाला नोटीस न देता, कोणत्याही वेळी व लागू असलेल्या कायद्याच्या अधीन राहून, कोणतीही तरतूद बदलू शकते किंवा काढून टाकू शकते, कोणतेही शुल्क वाढवू शकते किंवा बदलू शकते (कमी करणे वा वाढवणे यासह). संबंधित बदल www.ebixcash.com येथे उपलब्ध झाल्यावर 24 तासांनंतर, ते कार्डधारकाने पाहिले आहेत व मान्य केले आहेत, असे समजले जाईल. कोणत्याही शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार एबिक्सकॅश/एचडीएफसी बँकेकडे आहे.

(लागू असलेला कायदा) या अटी व शर्ती आणि याअंतर्गत निर्माण होणाऱ्या सर्व बाबी भारतीय कायद्यांनुसार प्रशासित केल्या जातील आणि कार्डधारक व एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक मुंबई न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात समाविष्ट असतील.

(उत्पादनानिहाय अटी) फी व कार्डाशी संबंधित विशिष्ट अटी व शर्ती यासाठी कृपया कार्ड किटबरोबर दिलेल्या तपशीलवार अटी व शर्ती आणि वेलकम लेटर पाहावे.

8. हेल्प लाइन

आम्हाला 7666155220 या कस्टमर केअर सेंटर क्रमांकावर कॉल करा किंवा care@ebixcash.com यावर ई-मेल करा किंवा लिहा : इट्झ कॅश कार्ड लिमिटेड, टॉप 14वा मजला, टाइम्स टॉवर, कमला सिटी, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई - 400013.